ISSN No-2230-7850 Vol.1,Issue.IX/Sept 11pp.1-4

Research Paper

# या दषकातील ग्रामीण कवितेतील आधुनिकता आणि आक्रमकता

***प्रा.सुरेश शिंदे***
प्रमुख, मराठी विभाग,
श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा

15 ऑगश्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या देशाचे सरकार आपल्याला सावकार, जमीनदार, सरकारी कर्मचारी यांच्या कडून होणाऱ्या शोषणातून मुक्त करील असे शेतकऱ्यांना वाटू लागले. स्वतंत्र भारताच्या सरकारने शेतकऱ्यांसाठी तुकडे जोडा कायदा, कुळकायदा, कमाल जमीनधारण कायदा, ग्रामीण सहकारी पतपुरवठा योजना असे काही चांगले निर्णय घेतले. साधारण 1967 नंतर हरितक्रांतीची घोषणा झाली. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करणे आवश्यक झाले. रासायनिक खते, किटकनाशके, संकरित सुधारीत बियाणे, सिंचनाच्या सुविधा, कृषि यंत्रांचा वापर, शेतीमध्ये होऊ लागला आणि एक नवश्रीमंत बागायतदारांचा वर्ग निर्माण झाला. अधिक धान्य पिकवले जाऊ लागले हे खरे, परंतु कोरडवाहू शेतकरी, छोटे शेतकरी, शेतीत राबणारे मजूर हे मात्र उपेक्षितच राहिले. शेतीच्या भांडवलीकरणामुळे शेतकरी अधिक कर्जबाजारी होऊ लागला.

आधुनिकतेची ही लक्षणे कृषि संस्कृतीत दिसू लागली. गावामध्ये सहकारी सोसायट्या, पतसंस्था आणि त्यातून आलेले राजकारण यांनी गावातील समूहजीवनाचे तुकडे तुकडे केले. प्रसारमाध्यमांमधून सुखवादी, भोगवादी, चंगळवादी जीवनशैली खेड्यापाड्यात पोहोचली आणि खेडयाची पारंपारिक जीवनशैली या आधुनिक चंगळवादी वृत्तीने उद्‌ध्वस्त करून टाकली. खाणे–पिणे, वस्त्र–प्रावरणे, संपर्कसाधने, मोबाईल, टि.व्ही.या सगळ्याच बाबतीत भोगवादी संस्कृतिने कृषि संस्कृतिवर आक्रमण केले. पारंपारिक शेतकरी शेतीला काळी आई समजून भक्ती भावनेने तिची सेवा करीत होता. परंतु आजचा खेड्यातला तरूण चंगळ करण्यासाठी 'गहाण' ठेवायची वस्तु येवढ्याच दृष्टीने शेतीकडे पाहू लागला. आधुनिकतेने हा नवाच संघर्ष कृषि संस्कृतित आणून सोडला.

शिक्षणाच्या प्रसारामुळे ग्रामीण भागातही नवशिक्षित तरूणांची एक पिढी निर्माण झाली. तिच्यापुढे सुखी जीवाची स्वप्ने शिक्षणाने निर्माण केली. परंतु पारंपारिक शिक्षणाने आर्थिक उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या या तरूणांना दिल्या नाहीत. तरीसुद्धा या पिढीने आपल्या भोवतालचे वास्तव नीट समजावून घेतले. आपले शोषण कोण करतो आहे? याची जाणीव या पिढीला झाली आणि या जाणीवेतूनच शोषण करणाऱ्या प्रवृत्तीविरूद्ध विद्रोह मांडणारी मानसिकता जन्माला आली. आपल्यावरील अन्यायाचे कारण कोणते?आपण कर्जबाजारी का होतो?व्यापारी, दलाल आपले शोषण का करतात?या संबंधीचे चिंतन केले आहे आणि म्हणूनच उपेक्षा करणारे सरकार, लुटमार करणारे व्यापारी, दलाल, अडवणूक करणारे सरकारी कर्मचारी या साऱ्यांच्या विरूद्ध लढायला तयार झालेली पिढी आता लिहीती झाली आहे. कारण महात्मा फुलेंनी उगारलेले आसूडाचे स्वप्न सत्ताधाऱ्यांनी उद्‌ध्वस्त केले आहे हे तीव्रतेने या पिढीला जाणवले आहे. खरे तर शेतकऱ्यांचीच मुले आज राज्यकारभार करत आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना जाणीवही आहे. परंतु 'सत्तालोभ' शेतकऱ्यांच्या समस्यांपेक्षा मोठा झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधीची अनास्था, उपेक्षा, संवेदनहीनता सरकारच्या वागणूकीत दिसते. म्हणून येथे शेतकऱ्यांची मुले राज्य करतात पण हे राज्य शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे नाही! असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

शेतकऱ्यांच्या दुःखाचे चित्रण महात्मा फुलेंच्या नंतर विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, बहिणाबाई चौधरी, श्रीकांत देशमुख, प्रकाश होळकर यांच्या कवितांमधून आले. परंतु या दुःखाला कारण ठरलेल्या प्रवृत्ती विरूद्धचा बंडखोर आविष्कार 1990 नंतरच्या कवितेमध्ये प्रकर्षाने जाणवू लागला आहे. आर्थिक उदारिकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांच्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी झालेच नाही. दारिद्र्य, हालअपेष्टा संपल्या नाहीत. दुष्काळ, अतिवृष्टी, कर्जबाजारीपणा आणि त्यातून होणाऱ्या आत्महत्या हे ग्रामीण जीवनाचे वास्तव या कवींना प्रकर्षाने जाणवले आहे. म्हणून 'बळीराजा', 'जगाचा पोशिंदा', या बिरूदामधला भ्रम संपून गेला आहे आणि पायाखाली जळणारं वर्तमान त्यांना चांगलं कळलं आहे. आपल्याला केवळ निसर्गाची अवकृपाच उद्‌ध्वस्त करते असे नाही. तर या समाजातील धर्मसत्ता, धनसत्ता आणि ज्ञानसत्ता यांच्या स्वार्थातून पिढ्यानपिढ्या आपले शोषण होते आहे. हे या कवींना कळले आहे. शेतीत आणि गावात आधुनिकता आली परंतु शोषण आणि दुःख संपले नाही. म्हणूनच तो आक्रमक झाला आहे. ग्रामीण संस्कृतितल्या या परिवर्तनाचा आणि विद्रोहाचा शोध इ.स. 2000 नंतर प्रकाशित झालेल्या कवींच्या काव्यसंग्रहांच्या आधाराने येथे मांडलेला आहे. संदर्भासाठी 'भुईभोग' (संदीप जगताप), 'सिझर कर म्हणते माती' (कल्पना दुधाळ), 'भुईशास्त्र' (ऐश्वर्य पाटेकर), 'गोफणीतून निसटलेला दगड' (भरत दौंडकर) या कवींच्या कवितांच्या आधारे आजच्या ग्रामीण कवितेतील आधुनिकता आणि आक्रमकता यांचे विवेचन केले आहे.

कल्पना दुधाळ यांच्या कवितेत माणसाची आधुनिक जीवनशैली आता पिकांनाही हवी हवीशी वाटू लागली आहे. हे वास्तव सूचित होते. त्यांची पुढील कविता उदाहरणादाखल सांगता येईल. मातीपासून तुटलेली खेड्यातील नवी पिढी आणि पिकांची अवस्था चित्रित होते ती अशी –

'मी टाकलेली मेथी आणि कोथिंबिर
मागते माझ्याकडं
युरियाचा खाऊ
आणि लुसलुशीत व्हायचं ...... स्पेअर
रखरखीत झाडांच्या सालीनं
मॉइश्चराईझरचा हट्ट धरला आहे
.... आणि माती अडून बसलीय
'सिझर' कर म्हणत ....
मी काय करू?'

वेदना मधून साकार होणारा सर्जनाचा सोहळा माणसाला आणि मातीला आता नकोसा झाला आहे.

आम्ही आधुनिकतेचे, प्रगतीचे आलेख काढतो, मोजतो ते दिसणाऱ्या यांत्रिक, तांत्रिक साधनावरून पण अस्तित्वाचा मुलाधार असलेली भुक आणि त्याला लागणारी भाकरी ती अजूनही मिळत नाही. हजारोंच्या संख्येने रोज भुकेत भाजून निघणाऱ्यांचे वास्तव

सहजपणाने डोळ्याआड कसे करता येईल? मुठभर माणसांच्या जगण्यातील साधनांची रेलचेल पाहून प्रगती मोजायची की सुधारणेच्या परिघाबाहेर असलेल्या लाखो–करोडोंच्या भुक आणि भाकरीचा विचार करायचा. हा भेद त्यांच्या पुढील कवितेत स्पष्ट झाला आहे –

'जग जवळ आलं ..... लांब गेलं .....
काय फरक पडतो बाई?
ही तर जगण्याची लढाई
.... मी नेटवर सर्चमध्ये टाईप केलं
पोटाला काय घालू ?
तर उत्तरच आलं नाही ......'

ग्लोबलाईझेशनचे कौतुक फार झाले. पण लोकल असलेल्या माणसांच्या भुकेचे काय?कधी–कधी आधुनिकता व त्याने निर्माण केलेली सुखसाधने आणि वापरा व फेका यातून जन्माला आलेला कचरा बियाण्यांच्याच मुळावर कसा येतो याचे चित्रण कल्पना दुधाळांच्या कवितेत येते. या आधुनिकतेने मातीविषयीचे ममत्त्व आणि श्रद्धा नष्ट करून टाकली आहे. भोगवाद, सुखवाद आणि चंगळवाद यांच्या उसळलेल्या आगडोंबात मातीविषयीच्या प्रेमाचा जळून कोळसा झाला आहे. सुखाची कल्पना आधुनिक सुखसाधनांशी जोडल्यामुळे भावना आणि नात्यांचे प्रदेश कोरडे ठक्क झाले आहेत. ग्रामीण जीवनातील हे आंतरिक परिवर्तन दुधाळ यांनी 'लॅन्ड लाईन' या कवितेत आधोरेखित केले आहे ते असे –

'किती सोप्पयं रे राजा .....
सातबारा लिहून दिला की,
कोणतीही इंपोर्टेड .... नवीकोरी ..... चारचाकी
दारात उभी राहते ....
महागा–मोलाची वस्तु घरात येते
पैशावर नाचवता येतं ....
सोन्या–चांदीत मढवता येतं .... कुणालाही
गुंठामंत्री म्हणून मिरवता येतं
पण राजा .... आईचं काळीज मागणाऱ्या या व्यवस्थेला
..... तु तुझं काळीज काढून देशील?

तुझंही खरंच म्हणा
लॅन्ड लाईन राहिलीय कुठं?'

खरंतर माणूस आणि माती यांचा प्रश्न माणसाच्या अस्तित्वापासूनच तेव्हापासूनच तो जागतिक होता. मग आत्ताच्याच मोबाईल क्रांतीत जग जवळ आले म्हणण्यात काय अर्थ आहे?

'तिच माती ..... तिला कुठं अंत आहे?
तोच वारा ..... त्याला कुठं भिंत आहे?'

असे माणसाच्या वैश्विकतेचे पुरातन नाते दुधाळ मांडतात आणि आता शेतकरीच हे आपले पुरातन नाते आधुनिक जगात रूजवायला सिद्ध झाल्याचे दुधाळ सांगतात ते असे –

'मी निघाले आता .... सृजनाची ओंजळ घेऊन
या विश्वाच्या कानाकोपऱ्यात पेरायला
पोशिंद्याच ठळक नाव .... ग्लोबलाईझेशनवर कोरायला'

परंपरा आणि आधुनिकतेला अंतर्बाह्य संघर्ष आणि गुंतागुंत आधुनिक जगातल्या उपमा आणि प्रतिमांनी दुधाळ व्यक्त करतात. जीवनव्यवहाराचीच भाषा कवितेची भाषा होते. म्हणून या कविता अधिक कसदार आणि वास्तवाचे यथार्थ विश्लेषण मांडणाऱ्या झाल्या आहेत.

ग्रामीण कवितेतून शोषकांच्या प्रस्थापित संस्कृतिविरूद्ध विद्रोह मांडणारा दुसरा कवी म्हणजे संदीप जगताप. 'भुईभोग' हा त्यांचा कवितासंग्रह. कुणब्याच्या घरात पिढ्यान्‌पिढ्या भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा त्यानेही भोगल्या आहेत आणि सर्जन करणारा शेतकरी पुन्हा–पुन्हा बळी का जातो याचा शोध घेण्यासाठी तो धडपडतो आहे. हे साल नाही पिकलं तरी पुढचं साल चांगलं येईल. या वांझ आशावादावर इथला शेतकरी पिढ्यान्‌पिढ्या जगत आला आहे. जगाला जगवायचा धर्म कृषिकुळानं पाळला आहे. पण येणारं प्रत्येक साल अंगावरची सालच काढत गेलं सालोसाल. मातीत राबून किती पिढ्यांची माती झाली. तरी पुढची पिढी 'वसा' घेऊनच उगवत गेली. बापानं पिक चांगल यावं म्हणून वावरातलं तण काढलं. पण लबाड माणसांच्या मनातल्या तणानं पोशिंद्यालाच मातीत गाढलं. 'बळीराजा' ही 'भुल' फार महागात पडली. गीताभागवतानं 'तु कर्म कर काही मागण्याचा तुला अधिकार नाही' ही मारलेली अध्यात्मिक 'थाप' कष्टकऱ्यांच्या कित्येक पिढ्यांच्या मुळावर आली. शोषकांनी ग्रंथ 'सोईचे' आणि संत 'गाळून' घेतले. एकंदरीत देवाच्या दारात, दलाली बाजारात, स्वाहाकारी सरकारात सर्वांगाने ओरबडला गेला तो शेतकरी; शोषणाच्या इतिहासाचा, त्याच्या मनाचा, मातीचा आणि मतीचा ठणका म्हणजे संदीप जगतापच्या कविता आहेत.

खरे तर मातीचा काहीच गुन्हा नाही. मतलबी आणि मातलेले लुटारू खरे गुन्हेगार आहेत. शेतकरी भोळा आहे. त्याला व्यवहार कळत नाही. म्हणून कुणब्याला नेहमी आरोपींच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. खरे तर भेगाळलेल्या भुईचा भोग पॉलिहाऊस मधल्या प्रतिभावंतांना कळला नाही. भुई इतकीच जाळभाज भोगणाऱ्या कवीला तो कळला आहे. उन्हातान्हात हळ्या मारून नांगराच्या पाळ्या घालणारा बाप, तण खुरपून–खुरपून करपून गेलेली माय, अंगावरची साल काढणारं असं प्रत्येक साल, खरंच इतकी विषारी नसेल भिंतीवरची पाल! सोन्यासारख्या पिकाची माती करणारं मार्केट, खिशात सातबारा घेऊन बँकेच्या दारात हरितक्रांतीत होरपळलेला, लाळ घोटणारा शेतकरी, मताच्या मातीची शपथ घेऊन उलटलेला पुढारी आणि शेतकऱ्यांच्या कत्तली करणाऱ्या सोसायट्या हे सारे भोग कवीने बघीतले नाहीत तर भोगले आहेत.

म्हणून निर्धार करतो, ऐन युद्धाच्या वेळी अर्जूनासारखं अवसान गाळायच नाही. पिकाला क्रांतीची ट्रिटमेंट करून मुळाला खत म्हणून सुरूंगाची दारू घालावी लागेल. म्हणजे लबाडाच्या पोटात घास जाताच त्याच्या चिंधडया उडतील आणि नासक्या रक्ताचे पाट वाहतील. तोच परिवर्तनाचा दिवस असेल. त्यासाठी बाजारात घात करणाऱ्याला घास द्यायचा नाही, मातीला रक्ताचा टिळा लावून हातात विळा घ्यावा लागेल, शोषकाच्या गळ्यावर रूमण्याच्या तलवारीचं पातं ठेवावं लागेल. नांगराच्या फाळानं बदलेल 'भाळ' पण नांगराचं शस्त्र केलं तर ..... तरच मुळावर आलेलं तळातून मारून टाकता येईल, अशी प्रतिज्ञा करून लढाईला सिद्ध झालेल्या नव्या पिढीचा प्रतिभावंत प्रतिनिधी म्हणजे संदीप जगताप. ज्यांनी अंगावर काहीच ठेवलं नाही. त्यांच्या साहित्य संकल्पनेला सोसवेल असं सत्य सांगण्याचं कारण काय?ते मुळातच नागवले गेलेल्यांच नागडेपण आहे. त्यासाठी बुरखा कशाला? ही कवीची वेगळी ओळख आहे.

शेतकऱ्यांचे दुःख पुन्हा–पुन्हा मांडून झाले. परंतु शोषकांच्या मुर्दाड व्यवस्थेला त्याचे आव्हान पोहोचलेच नाही. सहनशीलतेच्या मर्यादा संपल्या की आव्हानाची भाषा मागे पडते, आक्रोश थांबतो आणि शोषकाच्या मुळावर घाव घालणारी आक्रमणाची भाषा कवी बोलू लागतो. व्यवस्थेला न्यायासनासमोर उभे करून जाब विचारू लागतो. ही त्याची भाषा क्रांतीची, विद्रोहाची असते. म्हणून संदीप जगताप शोषकांच्या चिंधडया उडवण्यासाठी पिकाला खत म्हणून सुरुंगाची दारू घालायला सिद्ध होतो आणि हे अन्न शोषकांच्या पोटात गेल्यावर त्यांच्या चिंधड्या उडतील असे भासचित्रही पाहतो ते असे –

'मला वावरातल्या
पिकांनाच
सुरूंगाची दारू खत म्हणून टाकावी वाटते
म्हणजे .....
त्या धान्याचं
अन्न झाल्यावर
आणि या मुर्दाडांच्या पोटात गेल्यावर

त्यांच्या रक्तातून क्रांतीचेच स्फोट व्हावेत
या अपेक्षेनं ....!'

शोषकांना नेस्तनाबुत करण्याचा आणि लिलावात मारणाऱ्या दलालांचा नायनाट करायचा तर कुणब्याच्या पोरांनी एकत्र यावे आणि ठराव करावा. पोटापुरतच पिकवावं. बाजारात नेवून विकायचं नाही. असे केले तर शोषण करणाऱ्या बाजारपेठा उद्ध्वस्त होतील. ही लढाई शोषकाविरूद्धची आहे. हातात नांगर आणि विळा ही शस्त्रे घेऊन ही संघर्ष सेना उभारली आहे. बांधावरल्या झाडाला लटकून मरायचं नाही ही भावना व्यक्त करताना कवी लिहीतो –

'आता आमचा जथा निघालायं
भुकेचं बॅनर खांद्यावर घेऊन
दिल्लीच्या तख्ताला आव्हान द्यायला
फास घेऊन मरण्यापेक्षा
लढता लढता सरणावर जायला'

कष्टकऱ्यांच्या तरूण पिढीला ही संदीप जगतापची कविता आव्हान करते ती असे –

'म्हणून तू आता उठ
चांगला पेटून उठ
हातातल्या रूमण्याचीच तलवार कर
तुझ्या टाळूवरलं लोणी खाणाऱ्यावर
डोळे झाकून वार कर'

एकूणच राजसत्ता, धनसत्ता आणि धर्मसत्ता यांनी नागवलेल्या शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या पोरांची पिढी आता आक्रमक झाली आहे. सोसायट्या, बॅंका, पतसंस्था हे कुणब्यांची कत्तल करणारे कत्तलखाने झाले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांची यंत्रणा दिसेल तिथे कुणब्यांना आडविते, नाडते आहे आणि दलाली बाजारपेठ त्यांच्या आयुष्याचेच बोली लावते आहे. या विरूद्धचा विद्रोह संदीप जगतापची कविता मांडते.

'भुईशास्त्र' हा ऐश्वर्य पाटेकर यांचा कवितासंग्रहही याच वाटेने जाणारा आहे. वर्तमानातील भेसूर वास्तवावर आणि कुणब्यांचे शोषण करणाऱ्या शोषकांवर ती आसूडाचे फटकारे उडविते. आता दुःख सोसत बसणे पुरे झाले. आता शोषकांचा बिमोड करण्यासाठी हातात रूमणेच घ्यावे लागेल. सोंगून झाल्यावर उरलेल्या धसकटाची आता शस्त्रे होतील. या शब्दात आक्रमकता प्रकट होते. आता जर बळीराजाला राजाच व्हायचे असेल तर त्याने धैर्य–धाडस जमवून गुलागिरीचे पारंपारिक जू फेकून दिले पाहिजेत. हा आशय 'अन् तू मुलखाचा राजा' या कवितेत व्यक्त झाला आहे तो असा –

'आज्ञा मिळायच्या आधी
उधळून दे खूर
शिंगानं उपस माती
शेपूट उडव हवेत
पळत सूट चौखूर ....
सोबत जुंपलेल्या घोडयाच्या तोंडाला आण फेस
आऱ्या टोचणाऱ्या आणि शेपूट पिरगाळणाऱ्याला
पाड तोंडघशी ......

आता बघ! आख्खा मुलूख तुझा
अन् तू मुलखाचा राजा ....'

भरत दौंडकर हा शोषकांच्या विकृत स्वार्थाचा जाहीर पंचनामा करणारा याच परंपरेतला कवी. सत्ताधारी आणि व्यापारी, दलाल यांना परखड शब्दात जाब विचारतो तो असा –

'देहाचं कणीस करून
जीवाची मळणी करून
आत्मासुद्धा उफणला वाऱ्यावर
मग दाण्या–दाण्यावर
आपलं नाव का दिसत नाही?'

सर्जन करणाऱ्या शेतकऱ्याला मालाचा भाव सांगण्याचा अधिकार कधीच राहू नये इतकी कुटील व्यवस्था शेतकऱ्यांनीच तयार केली आहे. म्हणून सत्ताधिशांची लाज काढण्यासाठी आणि त्यांचे दांभिक मुखवटे फोडून काढण्यासाठी अत्यंतिक उपहासगर्भ